**नि.फौ.ख.क्र-३८६/२०२२**
**नि.क्र.४२**

**सरकारतर्फे साक्षीदार क्र.०४ यांचा पुरावा**

मी शपथेवर सांगतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | - | जब्बार रहीमखान पठाण, |
| वय | - | ५८ वर्षे, |
| व्यवसाय | - | सहा. फौजदार, |
| राहणार | - | पोलीस मुख्यालय, ता. जि.- अहमदनगर. |

**सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ठाकुर यांच्यामार्फत सरतपास सुरु**

१. दिनांक १४.०४.२०२१ रोजी, मी नगर तालुका पोलीस ठाणे, अहमदनगर येथे सहाय्यक फौजदार म्हणून कार्यरत होतो. त्या दिवशी पोलीस ठाण्याचे तत्कालीन ठाणे अंमलदार श्री.लबडे यांनी लेखी आदेशानुसार गु.र.क्र.१८२/२०२१ भा.दं.वि. कलम ३७९ चा तपास माझ्याकडे सोपविला होता. सदर आदेशाची प्रत आता मला दाखविण्यात आली. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर ठाणे अंमलदार यांची सही आहे. ती मी ओळखतो. सदर आदेशाच्या प्रतीस **निशाणी ४३** देण्यात येते. सदर आदेशासोबत मला फिर्याद, छापील एफआयआर व दैनंदिन अहवाल ही कागदपत्रे प्राप्त झाली होती.

२. तपासादरम्यान, दिनांक १५.०४.२०२१ रोजी, मी घटनास्थळी जावून दोन पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला. सदर पंचनामा आता मला दाखविण्यात आला. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर पंचांच्या सहया आहेत. त्या मी ओळखतो. सदर पंचनामा निशाणी ३१ कडे आहे. त्यानंतर मी घटनेशी संबंधित साक्षीदारांचे जबाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले.

३. नगर तालुका पोलीस ठाणे येथे याच खटल्यातील आरोपींविरुध्द गु.र.क्र.३४४/२०२१ भा.दं.वि. कलम ३७९ चा गुन्हा दाखल झालेला होता. सदर गु.र.क्र. ३४४/२०२१ चा तपास श्री. लबडे यांच्याकडे होता. गु.र.क्र. ३४४/२०२१ च्या तपासाकामी गु.र.क्र.१८२/२०२१ मधील मुद्देमाल/३एचपीची पाणबुडी मोटार श्री. लबडे यांनी आरोपी दिपक घायमुक्ते याच्याकडून जप्त केली होती. त्यामुळे मी श्री. लबडे

यांना पत्र देवून गु.र.क्र.३४४/२०२१ मधील मुद्देमाल पावती, फिर्याद व  जप्ती पंचनामा या कागदपत्रांची मागणी केली. सदर पत्राची प्रत आता मला दाखविण्यात आली. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी ४४** देण्यात येते. गु.र.क्र.३४४/२०२१ मधील मुद्देमाल पावती, फिर्याद व जप्ती पंचनामा ही कागदपत्रे गु.र.क्र.१८२/२०२१ च्या दोषारोपपत्रासोबत मी सामील केली आहे. आता मला गु.र.क्र.३४४/२०२१ मधील फिर्याद व  जप्ती पंचनामा यांच्या साक्षांकीत प्रती दाखविण्यात आल्या. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यांना अनुक्रमे **निशाणी ४५ व ४६** देण्यात येते. आता मला गु.र.क्र.३४४/२०२१ मधील मुद्देमाल पावतीची छायांकीत प्रत दाखविण्यात आली. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. (सदर मुद्देमाल पावती छायांकीत प्रत असल्यामुळे त्या पावतीस निशाणी क्रमांक देता येत नाही.)

४. तपासादरम्यान त्यानंतर मी फिर्यादी व इतर साक्षीदार यांचे पुरवणी जबाब नोंदविले. दिनांक २२.०७.२०२१ रोजी मी आरोपींना अटक करुन न्यायालयासमोर हजर केले. तपासाअंती आरोपींनी फिर्यादीच्या मालकीची ३एचपीची पाणबुडी मोटारची चोरी केल्याचे निष्पन्न झाल्याने मी त्यांच्या विरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. मी आरोपींना पाहिल्यास ओळखू शकतो. ते न्यायालयासमोर हजर नाहीत. (आरोपी क्र.१ ते ३ यांनी गैरहजेरी निशाणी ४१ वरील आदेशान्वये माफ करण्यात आली आहे.)

**सरतपास पूर्ण.**

**आरोपींतर्फे वकील श्री.व्यवहारे  यांच्यामार्फत उलटतपास सुरु**

५. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळाचा पंचनामा पोलीस ठाण्यात बसून तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षीदारांचे जबाब, फिर्यादीचा पुरवणी जबाब व तसेच साक्षीदारांचे पुरवणी जबाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे घेतलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, गु.र.क्र.३४४/२०२१ मधील जप्त ३एचपीची पाणबुडी मोटार ही या खटल्यातील फिर्यादीच्या मालकीची असल्याबाबत मी कोणतिही शहानिशा माझ्या तपासादरम्यान केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत खटल्यामध्ये वर्ग करुन

घेतलेला मुद्देमाल हा चुकीच्या वर्णनाचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीमध्ये ३एचपीची पाणबुडी मोटार ही रिगल कंपनीची असल्याबाबतचा उल्लेख आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर मोटार ही रिगल कंपनीची असल्याबाबतचा उल्लेख निशाणी ४६ कडील जप्ती पंचनाम्यामध्ये नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रस्तुत खटल्यामध्ये चुकीचा वर्णनाचा मुद्देमाल गु.र.क्र.३४४/२०२१ मधून हस्तगत करुन आरोपींना खोटया पध्दतीने या खटल्यामध्ये गोवले आहे.

**<u>उलटतपास पूर्ण. फेरतपास नाही.</u>**

दि.१०.०२.२०२६

.

वा.दा.ब.अ.क.केले. समक्ष

SACHIN SHIVAJIRAO UBALE
Digitally signed by SACHIN SHIVAJIRAO UBALE
Date: 2026.02.10 16:53:18 +0530

**(एस.एस. उबाळे)**
**अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,**
**न्यायालय क्र.८, अहमदनगर.**